करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. २०५


महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २६/०३/२०२०

**वाचले:-** १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५ चे कलम २५, ३०, ३३, ३४ व कलम ४१.

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०.

४) साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७.

५) मा.जिल्हाधिकारी यांचे करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक-९१ क्रमांक : साशा/कार्या/ ब-५/करोना/प्रतिबंधउपाययोजना/२०२० दि.२२/०३/२०२०.

६) मा.जिल्हाधिकारी यांचे करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक-९८ क्रमांक : साशा/कार्या/ ब-५/करोना/प्रतिबंधउपाययोजना/२०२० दि.२४/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्‌घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा एक भाग म्हणून औद्यिगिक व खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने, उपोद्‌घांतातील अ.क्र.५ व अ.क्र. ६ कडील आदेशान्वये औद्योगिक व खाजगी आस्थापना दिनांक ३१ मार्च,२०२० बंद करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त आदेशान्वये खाद्यपदार्थ, औषधे, वैद्यकीय उपकरणे, सलग उत्पादन प्रकीया चालू असणा-या कंपन्या, पेट्रोल पंप, इंधन तेल कंपनी व त्यांचे गोदाम हे चालू राहणार आहेत.

उपोद्‌घांतातील अ.क्र. ५ व अ.क्र. ६ कडील आदेशान्वये दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यत बंद करण्यात आलेल्या औद्योगिक कंपन्यामधील व पेट्रोलीयम पदार्थ, कच्चे खनिज तेल (Cruid Oil) साठवणूक करणा-या गोदामांमधील यंत्रसामुग्री दुरुस्ती व देखभाल, कंपनी परिसरात रखवाली व साफसफाई करणेकामी कमाल ०२ वाहने व जास्तीत जास्त २० इतके कर्मचारी (वाहनचालकांसहीत) यांना कंपनीमध्ये प्रवेश देण्यास या आदेशान्वये मुभा देण्यात येत आहे. बंद औद्योगिक कंपन्यामध्ये आवश्यकतेनुसार कर्मचारी यांना (कमाल २०) प्रवेश करण्यास मुभा देणेकामी परवानगी पत्र संबधीत तहसिलदार यांनी आपले स्तरावरुन द्यावे.

( निधी चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति,

१. सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड

२. कामगार आयुक्त पनवेल

३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र रायगड
४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग व महाड
५. उपविभागीय अधिकारी, सर्व
६. तहसिलदार, सर्व

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
४. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
६. पोलीस अधिक्षक रायगड - अलिबाग
७. पोलीस उपायुक्त, झोन- २, पनवेल
८. आयुक्त पनवेल महानगर पालिका.

( निधी चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग